# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# प्रा. ए. व्ही. देशपांडे साहित्यिक, सांस्कृतिक चळवळ : डॉ. सागर देशपांडे

## पत्रकारितेतील माझी ५० वर्षे पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उत्साहात

पाटण, दि. २५ : वाचन, लेखन, अभ्यास आणि संपादनाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या ए. व्ही. देशपांडे यांनी पाटणसारख्या तालुक्याच्या ठिकाणी राहून देखील तिथला पत्रकार संघ, ग्रंथालय संघ, साहित्य परिषदसारख्या संस्थांमधून मोलाची भूमिका बजावली. ग्रंथपाल म्हणून पूर्णवेळ नोकरीची जबाबदारी सांभाळतानाही सर्व कार्यक्षेत्रात एक निःस्वार्थी कार्यकर्ता म्हणून नेहमीच समन्वयाची भूमिका पार पाडली. साहित्यिक, सांस्कृतिक घडामोडीत तळमळीने सहयोग दिला. पुणे, मुंबईपासून दूर असले तरी पाटणमध्ये विविध विधायक उपक्रम सुरू व्हावेत यासाठी त्यांनी परिश्रम घेतले. या सर्वांचा गेल्या ५० वर्षांचा धावता आढावा 'पत्रकारितेतील माझी ५० वर्षे' या पुस्तकातून त्यांनी घेतला आहे. पाटणचा स्थानिक इतिहास म्हणूनही या पुस्तकाचे स्थान आजच्या पिढीसमोर महत्त्वाचे असल्याचे मासिक जडण-घडणचे मुख्य संपादक डॉ. सागर देशपांडे यांनी पाटण येथे बोलताना सांगितले.

ज्येष्ठ पत्रकार व सेवानिवृत्त ग्रंथपाल प्रा. ए. व्ही. देशपांडे यांनी लिहिलेल्या 'पत्रकारितेतील माझी ५० वर्षे' या पुस्तक प्रकाशन समारंभावेळी ते बोलत होते. यावेळी कोयना शिक्षण संस्थेचे सचिव अमरसिंह पाटणकर, लेखक प्रा. ए. व्ही. देशपांडे, बा. दे. कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.



पुस्तक प्रकाशनप्रसंगी डॉ. सागर देशपांडे, प्रा. ए. व्ही. देशपांडे, अमरसिंह पाटणकर.

यावेळी बोलताना लेखक प्रा. ए. व्ही. देशपांडे म्हणाले, पत्रकारितेतील गेली ५० वर्षे काळाच्या ओघात मी काम करत गेलो. लिखाण हा माझा छंद आहे. १९८० मध्ये पाटण शहरात आलो. समाजाला काही तरी द्यायचे म्हणून नाटकं लिहिली, गाणी लिहिली आणि ती समाजापुढे मांडली. १९६०-६५ काळात कलात्मक प्रेरणा असणारे लोक कमी होते. १९८३ मध्ये पाटण तालुका पत्रकार संघ स्थापन केला. पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी विचार विनिमय होत होता. १९८५ मध्ये पाटण तालुका साहित्य संमेलन परिषद स्थापन केली. १९८३ पासून जे काही सहकाऱ्यांच्या बरोबर कार्य केले त्याची फक्त शब्दरूपात मांडणी केली. सुसंस्कृत माणूस घडवायचा असेल तर साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रातील जडणघडण महत्त्वाची आहे, असे त्यांनी सांगितले. अमरसिंह पाटणकर म्हणाले, प्रत्येकाच्या अंगी काहीतरी चांगले गुण असले पाहिजेत. हे चांगले गुण आपणाला विकसित करता आले पाहिजेत. पत्रकारितेतील माझी ५० वर्षे या पुस्तकाच्या माध्यमातून ए. व्ही. देशपांडे यांनी आजच्या व पुढील पिढीला आदर्शवत लिखाण करून ठेवले आहे. ते प्रत्येकाने वाचले पाहिजे. वाचन संस्कृती जोपासली पाहिजे.

यावेळी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. ग्रंथपाल संजय इंगवले यांनी प्रास्ताविक केले. सौरभ देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. या पुस्तक प्रकाशन समारंभास विक्रमबाबा पाटणकर, दीपकसिंह पाटणकर, ज्येष्ठ पत्रकार बबनराव कोळी, संपतराव देसाई, सी. डी. केळकर, पाटण तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पवार, जालिंदर सत्रे, शंकर मोहिते, विद्या म्हासुर्णेकर, नीलेश साळुंखे, उमेश सुतार, राजेंद्र सावंत, दादासाहेब पवार आदींसह देशपांडे कुटुंबीय, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.